# दि अभिनव सहकारी बँक लिमिटेड, डोंबिवली

**दि अभिनव सहकारी बँक लिमिटेड, डोंबिवली यांच्या शनिवार, दिनांक ९ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त :**

दि अभिनव सहकारी बँक लिमिटेड, डोंबिवली यांची ४८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दिनांक ९ सप्टेंबर, २०२३ रोजी सकाळी १० वाजता हॉटेल शिवम, प्लॉट नं. पी-१४, एल. आय.सी. ऑफिस जवळ, आर. आर. हॉस्पिटलच्या मागे, एम. आय. डी. सी., डोंबिवली ( पूर्व) येथे संपन्न झाली. या सभेस एकूण १३७ सभासद उपस्थित होते. आवश्यक गणपूर्ती न झाल्यामुळे सभा तहकुब करुन नियोजित वेळेनंतर अर्ध्या तासाने म्हणजे सकाळी ठिक १०.३० वाजता सुरु करण्यात आली. सभेचे अध्यक्षपद बँकेचे अध्यक्ष, माननीय श्री. रमेश रतन पाटील यांनी भूषविले.

तद्नंतर सौ. अश्विनी सुनिल प्रभुणे यांनी सभेच्या कामकाजास प्रत्यक्ष सुरुवात करण्यापुर्वी अहवाल वर्षात बँकेचे विद्यमान संचालक कै. दिगंबर प्रल्हाद नेहेते, माजी अध्यक्ष कै. मनोहर सडेकर, माजी उपाध्यक्ष कै. सत्यवान विठ्ठल म्हात्रे व कै. वामन सखाराम म्हात्रे यांचे अल्पशा आजारपणाने निधन झाले आहे तसेच बँकेचे जे सभासद, ठेवीदार, खातेदार व हितचिंतक तसेच, राजकिय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व क्रिडा या व अशा अन्य क्षेत्रांतील ज्या विभूती पंचतत्वात विलिन झाल्या आहेत अशा सर्वांस श्रद्धांजली अर्पण करण्याचे आवाहन सभेस केले. सर्व उपस्थितांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून निधन पावलेल्यांच्या आत्म्यांस सद्गती व चिरशांती लाभो अशी इश्वर चरणी प्रार्थना करुन, त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

बँकेच्या कर्मचारी, सौ. अश्विनी सुनिल प्रभुणे यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले व बँकेच्या प्रथेनुसार बँकेच्या ज्येष्ठ सभासद, श्री. दिगंबर ढाके व श्रीमती चंद्रकला चौधरी यांना बँकेचे आद्य संस्थापक, कैलासवासी श्री. दत्तात्रय माधवराव मुनशी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन, श्रीलक्ष्मीच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन करण्याची विनंती केली.

तद्नंतर विषय पत्रिकेनूसार सभा सुरु होण्यापुर्वी सभासदांनी कार्यालयाकडे अर्ज केल्यानूसार इयत्ता १० वी, १२ वी, पदवी आणि पदव्युत्तर परिक्षांमधे तसेच, क्रिडा क्षेत्रात उज्ज्वल कामगिरी केलेल्या पाल्यांचा संचालक मंडळातर्फे बँकेचे सन्मानचिन्ह, रोख पारितोषिक व पुष्पगुच्छा देऊन सत्कार करण्यात आला.

यानंतर सौ. अश्विनी सुनिल प्रभुणे यांनी बँकेचे माननीय अध्यक्ष, श्री. रमेश रतन पाटील यांना अध्यक्षीय भाषण करण्याची विनंती केली.

सर्वप्रथम माननीय अध्यक्ष, श्री. रमेश रतन पाटील यांनी उपस्थित सर्व सभासद बंधु-भगिनींचे व व्यासपीठावरील सर्व मान्यवर संचालकांचे बँकेच्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमधे हार्दिक स्वागत केले. तद्नंतर त्यांनी माहिती दिली की, मागील दिनांक १० ऑगस्ट, २०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील ठरावान्वये सन २०२२-२०२३ या कालावधीकरिता बँकेचे वैधानिक लेखापरिक्षक म्हणून मे. एस. व्ही. ए. बी. ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउंटंट्स यांची नेमणूक करण्यात आली होती. वैधानिक लेखापरिक्षकांनी त्यांचा अहवाल बँकेस व माननीय सहकार आयुक्त व निबंधक यांच्या कार्यालयात सादर केल्यामुळे सदर सभा आयोजित करण्यात आली.

M/S. ABHINAV SAHAKARI BANK LTD. Dombivli H. O. Central Office

तद्नंतर त्यांनी सन २०२२-२०२३ या कालावधिकरिताचा बँकेचा ४८ वा वार्षिक अहवाल, वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेले ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संचालक मंडळाच्यावतीने सभासदांसमोर सादर केला. अहवाल वर्षी आपल्या बँकेस वैधानिक लेखापरिक्षकांनी " अ " वर्ग दिला असल्याची माहिती त्यांनी सभेस दिली. सभासदांना ७ टक्के दराने लाभांश वितरित करण्याची शिफारस संचालक मंडळाने सभेस केली आहे असे सांगीतले.

दिनांक ३१ मार्च, २०२३ अखेर कामकाजाचा संक्षिप्त आढावा सभेसमोर मांडतांना त्यांनी विदीत केले की, बँकेच्या ठेवी रु. ४६४.०३ कोटी, कर्जव्यवहार रु. २७०.०८ कोटी, असून बँकेस अहवाल वर्ष अखेर रु. २.७९ कोटी एवढा निव्वळ नफा झाला आहे.

तद्नंतर, मा. अध्यक्षांनी सर्व सभासदांना माहिती दिली कि बँकेच्या ४८ वर्षाच्या वाटचाली मध्ये यावर्षी प्रथमच सहकार क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करिता दिला जाणारा व सहकार क्षेत्रात प्रतिष्ठित समजला जाणारा बँको ब्लु रिबन अवार्ड २०२३ या पुरस्कारा करिता आपल्या बँकेची निवड करण्यात आली आहे. सदरची बाब बँकेच्या सर्व सभासदांसाठी अभिमानाची व गौरवाची गोष्ट आहे. त्यांनी सर्व सभासद, ग्राहक व हितचिंतक यांचे अभिनंदन केले व अभिनंदनाचा प्रस्ताव सभेसमोर सादर केला यावर सर्व सभासदांनी संमती दिली व पुढील ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र. १.** ठराव करण्यात येतो की, सहकार क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करिता दिला जाणारा व सहकार क्षेत्रात प्रतिष्ठित समजला जाणारा बँको ब्लु रिबन अवार्ड २०२३ या पुरस्कारा संबंधी अभिनंदनाचा प्रस्तावास मंजुरी देण्यात येत आहे.

सुचक : श्री. केवल अहिर (स.क्र. ६५०४६)
अनुमोदक : श्री. अनंत नामदेव अगावने (स.क्र.११३००८)

**ठराव एकमताने मंजूर.**

तद्नंतर त्यांनी असे विदित केले की आपल्या बँकेची केळकर रोड डोंबिवली पूर्व शाखा व समाशोधन विभागाची जागा जी भाडे तत्वावर होती त्याच्या भाड्या पोटी मोठी रक्कम प्रती वर्षी खर्ची पडत होती त्या अनुषंगाने डोंबिवली पूर्व शाखा हि दिनांक १० ऑगस्ट, २०२३ रोजी स्व:मालकीच्या जागेत स्थलांतरीत करण्यात आली आहे. बँकेच्या डोंबिवली पूर्व शाखेच्या नियोजीत जागेच्या खरेदी प्रकरणी कमी पडत असलेला इमारत निधी रक्कम रुपये १३५ लाख इतर मुक्त स्व:निधीतुन इमारत निधी मधे वर्ग करण्यासाठी दिनांक २० जानेवारी, २०२३ च्या संचालक मंडळात मंजुरी देण्यात आली. तसेच आपल्या एम.आय.डी.सी. शाखेचे पूर्ण नुतनीकरण करण्यात आले असुन बँकेच्या समाशोधन विभागाचे स्थलांतरण मुख्य कार्यालयात करण्यात आले आहे.

सभा अध्यक्षांनी नमूद केले की, बँकेच्या ४८ व्या अहवालात सन २०२३-२०२४ चे नफा-तोटा अंदाज पत्रक दिले आहे त्यानूसार बँकेचा निव्वळ नफा होण्याकरिता सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील. या सभेला उपस्थित राहिल्याकरिता त्यांनी सभासदांचे पुन्हा आभार मानले व सभेच्या विषयपत्रिकेनुसार सभेचे कामकाज होईल असे नमूद केले.

तद्नंतर विषयपत्रिकेनूसार सभेस सुरुवात करण्यात आली.

सरव्यवस्थापक, श्री. सुरेश मोहन शिंदे यांनी उपस्थित सर्व सभासदांचे ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत स्वागत करुन, सभेची विषयपत्रिका व सूचना सभेसमोर वाचून दाखविली.

THE ABHINAV SAHAKARI BANK LTD. Dombivli H. O. Central Office

३..

**विषय क्र. १. दिनांक १० ऑगस्ट, २०२२ रोजी झालेल्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

विषयाच्या सुरवातीस सरव्यवस्थापक श्री. सुरेश मोहन शिंदे यांनी दिनांक १० ऑगस्ट, २०२२ रोजी झालेल्या बँकेच्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या छायांकित प्रती बँकेच्या मुख्य कार्यालयात व सर्व शाखांमधे व बँकेच्या वेबसाईटवर सभासदांकरिता उपलब्ध करुन दिल्या असल्याची माहिती देऊन सदर इतिवृत्ताचे वाचन करण्याकरिता श्री. चंद्रशेखर गो. जोशी सहाय्यक सरव्यवस्थापक यांना पाचारण केले. सदरहू सभेतील निर्णयांचा / सूचनांचा पुर्तता अहवाल व केलेल्या कार्यवाहीची संक्षिप्त माहिती दिल्यानंतर श्री. चंद्रशेखर गो. जोशी सहाय्यक व्यवस्थापक यांनी या इतिवृत्तांस मंजूरी देण्याची विनंती सभेस केली. याविषयी सविस्तर चर्चा होऊन पुढील ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र. २.** ठराव करण्यात येतो की, दिनांक १० ऑगस्ट, २०२२ रोजी झालेल्या बँकेच्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात येत आहे.

सुचक : श्री. अनंत नामदेव अगावने (स.क्र.११३००८)
अनुमोदक : श्री. रमेश नानुलाल खंडेलवाल (स.क्र.२३०६७)

**ठराव एकमताने मंजूर.**

**विषय क्र. २. दिनांक ३१.०३.२०२३ अखेरच्या वर्षाचा, बँकेच्या कामकाजाचा अहवाल व वैधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्विकृत करणे.**

श्री. सुरेश मोहन शिंदे, सरव्यवस्थापक यांनी विदीत केले की, बँकेचे अध्यक्ष, श्री. रमेश रतन पाटील यांनी त्यांच्या अध्यक्षीय मनोगतात माननीय संचालक मंडळाचा अहवाल सभेसमोर सादर केला आहे. तसेच, कोणाही सभासदांचे हिशेबासंबंधी किंवा अन्य संदर्भातील माहिती अथवा सूचनांची पत्रे कार्यालयास प्राप्त झालेली नाहीत.

बँकेचे सभासद श्री. गोरखनाथ सखाराम म्हात्रे यांनी प्रश्न उपस्थीत केला की बँकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याने राजीनामा दिल्या नंतर आता सध्या कोण तज्ञ अधिकारी कार्यरत आहे? त्या संबंधी बँकेने काही व्यवस्था केली आहे का? या वर उत्तर देतांना श्री. सुरेश मोहन शिंदे, सरव्यवस्थापक यांनी सांगितले माहिती व तंत्रज्ञान विभागात नविन तज्ञ व्यक्तीच्या नेमणुकीची प्रक्रिया सुरु आहे. तसेच ग्राहकांना अधिक सुलभ व सुरक्षीत सेवा देण्या करिता व बँकेचा माहिती व तंत्रज्ञान विभाग अधिक सक्षम करणे करिता तांत्रीक व सुरक्षा (Technical IT and Security Consultation) तज्ञांची नेमणुक करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तद्नंतर श्री. गोरखनाथ सखाराम म्हात्रे यांनी प्रश्न विचारला कि संशयीत बुडीत कर्ज तरतूद काय आहे ? व ती कशा करिता केली आहे?. यावर उत्तर देतांना सरव्यवस्थापक श्री. सुरेश मोहन शिंदे यांनी माहीती दिली की बँक दरवर्षी संशयीत व बुडीत कर्जाची तरतूद करते. त्या प्रमाणे या आर्थिक वर्षात बँकेने संशयीत व बुडीत कर्जाची तरतूद केली आहे. ती तरतूद या यावर्षी रु. ५०.०० लाखाने वाढवली असुन ती या अहवालात दर्शवीली आहे.

THE ABHINAV SAHAKARI BANK LTD. Dombivli H. O. Central Office

त्यानंतर श्री. गोरखनाथ सखाराम म्हात्रे यांनी श्री डेंटल स्पेशालीटी हॉस्पीटल यांना दिलेले कर्ज व त्यासंदर्भातील वसुली बाबत विचारणा केली. विषयानुषंगाने माहीती देतांना संचालक अॅड श्री. रोहीदास दत्तु भंडारी यांनी थकबाकीदारा विरोधात बँक करत असलेल्या कारवाईची माहीती दिली. त्यांनी पुढे विदित केलेकी सदरहू थकबाकीदारा विरोधात महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा कलम १०१ अंतर्गत वसुली करिता प्रयत्नशील आहे परंतु थकबाकीदार त्या विरोधात मुंबई हायकोर्टात अपीलात गेला असल्या कारणाने बँकेस तारण मालमत्तेचा ताबा घेण्यास विलंब होत आहे. चर्चेत भाग घेतांना संचालक श्री. तुळशीराम विठ्ठल चौधरी यांनी सांगितले की सदरहु कोर्ट प्रकरणात तसेच विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोकण भवन येथे ते स्वत: उपस्थित होते व बँकेची कार्यवाही योग्य दिशेने चालु आहे अशी माहीती सभेस दिली.

अशी सविस्तर चर्चा होऊन पुढील ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र. ३.** ठराव करण्यात येतो की, वर्ष २०२२-२३ या कालावधीचा माननीय संचालक मंडळाचा बँकेच्या कामकाजाबद्दलचा अहवाल व वैधानिक लेखापरिक्षक यांचा अहवाल व त्यांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा - तोटा पत्रकांस ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : श्री. दिगंबर ढाके (स.क्र. १४७२)
अनुमोदक : श्री. चंद्रशेखर दुसाने (स.क्र. ९३०५५)

**ठराव एकमताने मंजूर.**

**विषय क्र. ३. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी माननीय संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे नफा विभागणीस मंजूरी देणे.**

सरव्यवस्थापक श्री. सुरेश मोहन शिंदे यांनी माहिती दिली की, यांनी सन २०२२-२०२३ साठी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ६५ अन्वये सर्व तरतूदी केल्यानंतर बँकेस अहवाल वर्षी रु. २,७८,७३,०३६.६६ एवढा नफा झाला आहे. सदरहू नफा रकमेत मागील वर्षाचा शिल्लक नफा रु. ७१,८९८.८१ जमा केल्यास अहवाल वर्ष अखेर एकूण नफा रु. २,७९,४४,९३५.४७ हा निव्वळ नफा विनियोगाकरिता उपलब्ध असल्याची माहिती दिली.

संचालक मंडळाने पुढील प्रमाणे नफा वाटणीची शिफारस केली असल्याचे सरव्यवस्थापक यांनी विदीत करुन त्यास मान्यता देण्याची विनंती त्यांनी सभासदांस केली.

| | | |
|---|---|---|
| वैधानिक राखीव निधी | रु. | ७०,००,०००.०० |
| सामान्य राखीव निधी | रु. | १२,००,०००.०० |
| गुंतवणूक चढ-उतार राखीव निधी | रु. | ६,००,०००.०० |
| लाभांश @ ७ % ( हिस्से राशी दराने ) | रु. | १,०१,३८,४९७.०० |
| सभासद कल्याण निधी | रु. | २०,००,०००.०० |
| निवडणूक निधी | रु. | ५,००,०००.०० |
| तंत्रज्ञान विकास निधी | रु. | १०,००,०००.०० |
| प्रशिक्षण निधी | रु. | ४५,००,०००.०० |
| सुवर्ण महोत्सवी निधी | रु. | १०,००,०००.०० |
| पुढील वर्षाकरिता शिल्लक नफा | रु. | ६,४३८.४७ |
| **एकूण** | रु. | २,७९,४४,९३५.४७ |

THE ABHINAV SAHAKARI BANK LTD. Dombivli H. O. Central Office

या विषयावर सविस्तर चर्चा झाली व खालील ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र. ४.** ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ६५ अन्वये आवश्यक तरतूदी केल्यानंतर संचालक मंडळाने पुढील तपशिलाप्रमाणे शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजूरी देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| वैधानिक राखीव निधी | रु. | ७०,००,०००.०० |
| सामान्य राखीव निधी | रु. | १२,००,०००.०० |
| गुंतवणूक चढ-उतार राखीव निधी | रु. | ६,००,०००.०० |
| लाभांश @ ७ % ( हिस्से राशी दराने ) | रु. | १,०१,३८,४९७.०० |
| सभासद कल्याण निधी | रु. | २०,००,०००.०० |
| निवडणूक निधी | रु. | ५,००,०००.०० |
| तंत्रज्ञान विकास निधी | रु. | १०,००,०००.०० |
| प्रशिक्षण निधी | रु. | ४५,००,०००.०० |
| सुवर्ण महोत्सवी निधी | रु. | १०,००,०००.०० |
| पुढील वर्षाकरिता शिल्लक नफा | रु. | ६,४३८.४७ |
| **एकूण** | रु. | २,७९,४४,९३५.४७ |

सूचक : श्री. अनंत नामदेव अगावने (स.क्र.११३००८)
अनुमोदक : श्री. राजन मराठे (स.क्र.५७११२)

**ठराव एकमताने मंजूर.**

**विषय क्र. ४. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालावर चर्चा करणे व स्विकृत करणे.**

विषयाच्या सुरुवातीस माननीय वैधानिक लेखापरिक्षक, मे. एस. व्ही. ए. बी. ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउटंट्स यांनी सन २०२२-२३ चे बँकेच्या केलेल्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचा गोषवारा, श्री. नविनचंद्र पुरुषोत्तम मेहता, व्यवस्थापक (लेखा परीक्षण विभाग ) यांनी सभेसमोर वाचून दाखविला. यांनी माहिती दिली की, यावर्षी बँकेस वैधानिक लेखापरिक्षकांनी " अ " वर्ग दिलेला आहे. कार्यालय सदरहू लेखापरिक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल विहित कालावधीमधे तयार करेल व तो आवश्यक विभागांकडे पाठविला जाईल.

सदरहू विषयावर सविस्तर चर्चा झाली व पुढील ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र. ५.** ठराव करण्यात येतो की, माननीय वैधानिक लेखापरिक्षक, मे. एस. व्ही. ए. बी. ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउटंट्स यांनी बँकेच्या सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या केलेल्या वैधानिक लेखापरिक्षणाचा अहवाल स्विकृत करण्यात येत आहे.

सूचक : श्री. रमेश नानुलाल खंडेलवाल (स.क्र. २३०६७)
अनुमोदक : श्री. सूरज्यामणी गौडा (स.क्र.१०४९१४ )

**ठराव एकमताने मंजूर.**

THE ABHINAV SAHAKARI BANK LTD. Dombivli H. O. Central Office

**विषय क्र. ५. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.**

विषयाच्या सुरुवातीस सन २०२१-२२ या आर्थिक वर्षा साठी वैधानिक लेखापरिक्षक, मे. बाऊल सावला ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउंटंट्स यांनी बँकेच्या केलेल्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालाचा गोषवारा श्री. नविनचंद्र पुरुषोत्तम मेहता, व्यवस्थापक (लेखा परीक्षण विभाग ) यांनी सभेसमोर वाचून दाखविला. सदरहू वैधानिक लेखापरिक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल दिनांक २८ सप्टेंबर, २०२२ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत मंजूर केला होता. दोष दुरुस्ती / पूर्तता अहवाल लेखापरिक्षकांनी तपासून दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजी स्विकृत केल्यावर सदरहू दोष दुरुस्ती / पूर्तता अहवाल माननीय सहकार आयुक्त, पुणे व संबंधित कार्यालयाकडे सादर करण्यात आल्याची माहिती सभेस देण्यात आली. अशा प्रकारे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या दोष दुरुस्ती अहवालावर चर्चा होऊन तो स्विकृत करण्यात आला.

**ठराव क्र. ६.** ठराव करण्यात येतो की, माननीय वैधानिक लेखापरिक्षक, मे. बाऊल सावला ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउटंट्स यांनी बँकेच्या सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद हि सभा घेत आहे.

सूचक : श्री. किसन अंबो गायकर (स.क्र.६२३२३)

अनुमोदक : श्री. अनिल प्रभाकर महाजन (स.क्र.५९२८१)

**ठराव एकमताने मंजूर.**

**विषय क्र. ६. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे.**

विषयानुषंगाने श्री. सुरेश मोहन शिंदे, सरव्यवस्थापक यांनी सहकार आयुक्त कार्यालयाने सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणासाठी तयार केलेल्या लेखापरिक्षकांच्या शासनमान्य नामतालिकेमधून आपल्या बँकेकरिता सन २०२३-२०२४ या कालावधीकरिता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून पुनर्नियुक्ती करणेसंदर्भात मे. एस. व्ही. ए. बी. ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउटंट्स यांनी बँकेच्या कार्यालयात अर्ज केल्याची माहिती सभेस दिली. त्यांनी सर्वसाधारण सभेस विनंती केली की, या कलम ८१ नूसार आपल्या बँकेच्या सन २०२३-२०२४ या कालावधीकरिता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून रिझर्व बँकेच्या मंजुरीस अधिन राहुन मे. एस. व्ही. ए. बी. ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउटंट्स यांची पुनर्नियुक्ती करण्याचा निर्णय घ्यावा. यावर सविस्तर चर्चा करण्यात आली व वैधानिक लेखा परिक्षकाची नेमणुक करण्याचे अधिकार संचालक मंडळास देण्याचे ठरविण्यात आले व खालील ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र. ७.** ठराव करण्यात येतो की, संचालक मंडळास दिलेल्या अधिकाराच्या अनुषंगाने बँकेचे सन २०२३-२०२४ या कालावधीकरिता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून मे. एस. व्ही. ए. बी. ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउटंट्स यांना रिझर्व बँकेच्या मंजुरीस अधिन राहुन पुनर्नियुक्ती करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. पुढे असाही ठराव करण्यात येतो की, त्यांना माननीय सहकार खात्याच्या परिपत्रकानूसार वैधानिक लेखापरिक्षणाचा मेहनताना देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सूचक : श्री. युवराज जावळे (स.क्र. ६४०४१)

अनुमोदक : श्री. अनिल प्रभाकर महाजन (स.क्र.५९२८१)

**ठराव एकमताने मंजूर.**

THE ABHINAV SAHAKARI BANK LTD. Dombivli H. O. Central Office

**विषय क्र. ७. सन २०२३-२०२४ च्या अंदाजपत्रकाची नोंद घेणे.**

श्री. सुरेश मोहन शिंदे, सरव्यवस्थापक यांनी बँकेच्या सन २०२३-२०२४ करिता नफा-तोट्यासंबंधीचे अंदाज पत्रक सभेसमोर सादर केले व अंदाज पत्रकाप्रमाणे आपल्या बँकेची वाटचाल चालू असून, वर्ष अखेर अंदाजपत्रकामधे नमूद केल्याप्रमाणे बँकेच्या ठेवी, कर्जव्यवहार व नफा होईल असा विश्वास व्यक्त केला.

**विषय क्र. ८. माननीय अध्यक्षांच्या संमतीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.**

बँकेचे जेष्ठ सभासद श्री. रमेश नारायण अळमेळकर यांनी सर्व सभासदांच्या पाल्यांचा इयत्ता १० वी, १२ वी, पदवी आणि पदव्युत्तर परिक्षांमधे तसेच, क्रिडा क्षेत्रात केलेल्या उज्ज्वल कामगिरी करिता बँक करित असलेल्या प्रोत्साहनाचे कौतुक केले. तसेच त्यांनी हा प्रश्न उपस्थीत केला की संबंधीत पुरस्कार बँक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्या करिता करित असते परंतु या कार्यक्रमास प्रत्यक्ष विद्यार्थी कमी उपस्थीत असतात. त्यावर उत्तर देतांना सरव्यवस्थापक श्री. शिंदे यांनी सांगितले कि बँकेच्या वार्षीक सर्वसाधारण सभेच्या वेळेस विद्यार्थ्यांचे कॉलेज अथवा क्लासेस असतात त्यामुळे ते वेळेच्या नियोजान अभावी या कार्यक्रमास उपस्थीत राहु शकत नाही.

कुमार ओमकार भगत व कुमारी रिद्धी कुंटे या पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना बँक करीत असलेल्या गुणगौरव पुरस्कारा संबंधी मा. अध्यक्षांचे व बँकेचे आभार मानले.

माननीय उपाध्यक्ष, श्री. दिलीप मथुरादास भोईर यांनी उपस्थित असलेल्या सर्व सभासदांचे आभार मानले व राष्ट्रगितानंतर माननीय अध्यक्षांच्या संमतीने सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

General Manager

THE ABHINAV SAHAKARI BANK LTD. Dombivli H. O. Central Office

सही/-

अध्यक्ष